# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक १२ जून, २०२३ / ज्येष्ठ २२, १९४५ (शके)

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**६७.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन गुरुवार, दिनांक ०३ मार्च, २०२२ रोजी सुरु होऊन शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण १९४ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी ३८ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती व एकूण १५६ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. त्यापैकी ६६ लक्षवेधी सूचनांची निवेदने सोमवार, दिनांक १८ एप्रिल, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली असून ९० प्रलंबित निवेदनांपैकी २२ निवेदने गुरुवार, दिनांक १२ मे, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आली आहेत. प्रलंबित ६८ निवेदनांपैकी १४ निवेदने गुरुवार, दिनांक २ जून, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आली आहेत. तसेच, प्रलंबित ५४ लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १२ निवेदने गुरुवार, दिनांक ३० जून, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. प्रलंबित ४२ निवेदनांपैकी १० निवेदने सोमवार, दिनांक १८ जुलै, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. प्रलंबित ३२ निवेदनांपैकी ५ निवेदने दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. प्रलंबित २७ निवेदनांपैकी १ निवेदने सोमवार, दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आले आहेत. त्यानंतर एकूण प्रलंबित २६ निवेदनांपैकी ७ निवेदने दिनांक १ डिसेंबर, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. १९ निवेदनांपैकी ११ निवेदने गुरुवार, दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. आता एकूण ०८ निवेदनांपैकी ०२ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

विधान भवन,<br>
मुंबई,<br>
दिनांक : **१२ जून, २०२३**

**जितेंद्र भोळे**<br>
सचिव-१ (कार्यभार),<br>
महाराष्ट्र विधानसभा.

...२/-

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.

२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.

३. संगणक कक्ष (website.)

४. अनुवाद कक्ष

५. प्रतिवेदन कक्ष

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**कॅप्टन आर. सेल्वन, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"सायन कोळीवाडा मतदार क्षेत्रामध्ये जवळपास ७०% जनता ही झोपडपट्टी मध्ये वास्तव्यास असणे, सदर ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांसाठी जवळपास १.५ किलोमीटर पर्यंत महानगरपालिका व सरकारी शाळा उपलब्ध नसल्याची बाब निदर्शनात येणे, परिणामी मुंबई सारख्या आंतरराष्ट्रीय शहरामध्ये विद्यार्थी व पालकांना शाळेत ये जा करण्याकरिता दररोज १.५ किलोमीटरची पायपीट करावी लागत असणे, तत्कालीन सरकारच्या काळात सन २०१६ मध्ये मी नवीन शाळेचे बांधकाम करण्याकरीता सभागृहात केलेल्या मागणी नुसार, MMRDA आयुक्त यांनी २०१९ मध्ये वडाळा येथील भूखंड शाळेचे बांधकाम करण्याकरीता राखीव केले असणे, याबाबत ५ वर्षाचा कालावधी होऊनही अद्यापपर्यंत MMRDA मार्फत सदर भुखंड उपलब्ध झाले नसल्याची बाब समोर येणे, यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असणे, परिणामी विभागातील नागरिकांमध्ये शासनप्रति पसरलेला तीव्र असंतोष विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळण्याकरीता सदर विषयाकडे शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

वडाळा, कोकरी आगार म्हाडा पुनर्वसन वसाहतीच्या १.५ कि.मी. परिसरात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क.दा. गायकवाड नगर, सरदार नगर व दोस्ती एकर्स असे मनपा शाळा संकुल उपलब्ध असून त्यामध्ये मराठी, हिन्दी, उर्दू, तामिळ, कन्नड आणि तेलगु माध्यमाच्या शाळा सुरू आहेत.

वडाळा येथील मोकळ्या शासकीय जमिनीवर ट्रक टर्मिनल उभारण्यासाठी दिनांक २९ जून १९८४ रोजी १२६.६४ हेक्टर जमीन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात आली आहे. सदरची जमीन ९९ वर्षाच्या भाडेपट्टयाने प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात आली आहे. त्यापैकी सन १९९३ मध्ये सी.एस.नं. ६पै., १०पै. ते २०पै., २५पै. व २६पै मधील ३.५८ हेक्टर जमीनीचा आगाऊ ताबा पी.एम.जी.पी. प्रकल्पांतर्गत इमारती बांधण्याकरीता म्हाडाकडे देण्यात आला होता. तदनंतर, शासनाच्या महसूल व वन विभागाने दि. २४/१०/२००५ रोजी निर्देशित केल्याप्रमाणे सदरची जमीन कायमस्वरुपी म्हाडाकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. म्हाडाच्या

ताब्यातील ३.५८ हेक्टर जमिनीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यानुसार वडाळा, कोकरी आगार या पुनर्वसन वसाहतीमध्ये सुमारे २५०१.७५ चौ.मी. क्षेत्राचा भूखंड प्राथमिक शाळा व खेळाच्या मैदानाकरिता आरक्षित आहे. यामधील रस्त्याचे क्षेत्र वगळता सुमारे १३९०.७६ चौ.मी. क्षेत्र जागेवर आढळून येत आहे. सदरचा आरक्षित भूखंड शाळेच्या प्रयोजनार्थ बृहन्मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरीत करणेबाबत म्हाडाला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून ना-हरकत कळविण्यात आली आहे. त्यानुसार सदरचा भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्याबाबतची कार्यवाही म्हाडाकडून करण्यात येत आहे.

वडाळा येथे ट्रक टर्मिनल विकसीत करण्याच्या दृष्टीने अधिसूचित क्षेत्राच्या नियोजनासाठी एमएमआरडीएला दिनांक ३ डिसेंबर, २००५ रोजी “विशेष नियोजन प्राधिकरण” म्हणून नियुक्त करण्यात आले होते. तदनंतर, दिनांक १६ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन अधिसूचनेन्वये सदर अधिसूचित क्षेत्रामध्ये ट्रक टर्मिनल ऐवजी वांद्रे-कुर्ला संकुलाचे धर्तीवर "वाणिज्यिक विकास केंद्र" विकसित करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. सदर अधिसूचित क्षेत्रातील प्राधिकरणाच्या ताब्यातील भूखंड "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७" मधील तरतुदीनुसार अधिमुल्य आकारुन ८० वर्षाच्या भाडेपट्ट्याने वितरीत करण्यात येतात. प्राधिकरणाच्या मंजूर विकास आराखड्यानुसार वडाळा अधिसुचित क्षेत्रातील टप्पा-३ मध्ये "सामाजिक व सांस्कृतिक सुविधा" वापरातील शाळा व मैदानासाठी भूखंड वितरित करण्यासाठी निविदा मागविण्यास प्राधिकरण सभेने दिनांक ०७/०७/२०२१ रोजी बैठकीत निर्णय घेतला आहे. सद्यस्थितीत प्राधिकरणाच्या वडाळा भारवाहक तळ टप्पा-३ मध्ये हॉस्पीटल तसेच शाळा व खेळाचे मैदानासाठी आरक्षित असलेला ८३६०२.१० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड माहे मार्च, २०१६ पासून ७ वर्ष कालावधीसाठी मेट्रो लाईन-३ प्रकल्पाच्या कास्टींग यार्डसाठी तात्पुरत्या स्वरुपात मुंबई मेट्रो रेल कॉ. लि. यांच्या ताब्यात देण्यात आली आहे. मेट्रो लाईन-३ प्रकल्पाच्या कामाकरीता सदर जागेची माहे मार्च, २०२३ पर्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे सदरची जमीन रिक्त झाल्यानंतर "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७" नुसार आवश्यक ती निविदा प्रक्रिया अवलंबून शाळा आरक्षित असलेले भूखंड वितरणाची प्राधिकरणाच्या स्तरावर नियोजित आहे.

******

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**श्री. रईस शेख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली विधानसभा लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्राबाहेरुन जाण्याच्या रिंगरोडच्या बांधकामास मार्च, २०१३ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, सदर बाह्यवळण रस्ता रिंग रोड ज्या गावांतून जाणार आहे त्या ९ गावांपैकी केवळ ३ गावांचे संयुक्त मोजणी झालेली असणे, सन २०१९ पासून रस्त्यांसाठी लागणाऱ्या जमीनीची मोजणी बंद असणे, संयुक्त मोजणी घेऊन रस्त्याचे काम त्वरीत सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मंत्री महोदय व संबंधित अधिकारी यांच्याकडे गेल्या दोन वर्षांच्या काळात अनेक वेळा मागणी केली असणे, प्रस्तावित रिंग रोडच्या जागेवर अंजूर फाटा हरिव्दारा सोसायटीच्या मागील बाजूस मौजे राहनाळ येथील स. नं. ५३१/१ पैकी एका खाजगी विकासकाने इमारतिचे बांधकाम सुरु करणे, सदर बांधकामामुळे रिंग रोडचे काम बाधित होणे, सदर इमारतीचे बांधकाम परवाना रद्द करुन रिंग रोडचे बांधकाम त्वरित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी यांनी आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका व आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मुंबई यांच्याकडे अनेक वेळी मागणी करणे, रिंग रोडचे बांधकाम त्वरित सुरु करण्याबाबत व व्यावसायीकाच्या बांधकामाचे परवानगी रद्द करण्याची आवश्यकता, शासनाची सदर विषयी केलेली वा करावयाची, शासनाची भूमिका व प्रतिक्रिया"

---

## मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

भिवंडी-निजामपूर महानगरपालिका शहराच्या मंजूर सुधारीत विकास योजनेमध्ये मौजे- चाविंद्रा येथील भिवंडी-नाशिक रोडपासून कल्याण-भिवंडी रस्त्यास छेदून अंजूरफाटा येथे जुना खारबांव रोडला जोडणारा ६० मी. रुंदीचा रस्ता दर्शविण्यांत आलेला आहे. सदर भिवंडी बाह्य वळण रस्ता (रिंगरोड) हा एकूण ९ वेगवेगळ्या महसुली गावांतून जात आहे. त्यापैकी चाविंद्रा, पोगांव, टेमघर, भादवड व कामतघर ही ५ गावे भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीत असून उर्वरीत ४ गावे- सावंधे, घोलगांव पिंपळनेर व राहनाळ ही महानगरपालिका हद्दीबाहेरची आहे. सदरच्या रिंग रोडची लांबी महानगरपालिका हद्दीत सुमारे ७.१२३ कि.मी. इतकी असून महानगरपालिका हद्दीबाहेर १.५ कि.मी. लांबी आहे. महानगरपालिका हद्दीबाहेरच्या ४ गावांसाठी मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण हे नियोजन प्राधिकरण आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २७ जून, २०१४ रोजीच्या १३४ व्या बैठकीत भिवंडी बाह्य वळण रस्त्याच्या प्रकल्पासाठी रु. २०१ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात

रेटा H/1021 (750-2-23) 

*************** 

(हस्ताक्षर)

आलेली आहे. तसेच सदर रस्त्याच्या भूसंपादन व मोजणी प्रस्तावास भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका महासभा ठराव दि.२९ जानेवारी, २०१५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर रिंगरोडसाठी आवश्यक असलेल्या जमीनीचे संपादन मनपा हद्दीत भिवंडी-निजामपूर शहर मनपामार्फत व मनपाहद्दीबाहेरील जमीन संपादन एमएमआरडीएकडून करण्यात येणार आहे.

सदर रिंग रोड संरेखनात बाधित होणाऱ्या ९ गावांतील जमिनीची संयुक्त मोजणी करण्याचे काम हाती घेण्यात आले होते. ९ गावांपैकी मौजे सावंधे, घोलगाव, राहनाळ या ३ गावांची संयुक्त मोजणी करण्यात आली असून माहे जानेवारी, २०१६ मध्ये उर्वरित ६ गावांच्या संयुक्त मोजणी करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि, स्थानिक रहिवासी/लोकप्रतिनिधी यांनी विरोध दर्शविल्यामुळे संयुक्त मोजणी करणे शक्य झालेले नाही.

प्रस्तावित रिंगरोड मधील मौज-पोगांव, चाविंद्रा येथील नाशिक हायवे ते तानसा पाईप लाईन (आ.क्र.१२४) या भागामधील सुमारे ६५ टक्के जमीन हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) माध्यमातून महानगरपालिकेने ताब्यात घेतली आहे. महानगरपालिका हद्दीतील ४,३१,०७१ चौ.मी. एवढे एकूण क्षेत्र प्रस्तावित ६० मी. रुंद रस्त्याने बाधित होत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असून, त्यापैकी आजमीतीस टीडीआर मध्यमातून १,१६,८६३ चौ.मी. क्षेत्र ताब्यात मिळाले आहे. उर्वरीत सुमारे ३,१४.२०७.८९ चौ.मी. क्षेत्र संपादन करावयाचे आहे. संपादन करावयाच्या जमिनीच्या क्षेत्रापोटी सन २०२१-२२ चा वार्षिक मुल्यदर तक्त्यामधील जमीन दर व नवीन भुसंपादन कायद्यातील तरतूदी ढोबळमानाने विचारात घेता अंदाजे रक्कम रु. ६०० कोटी इतका मोबदला देय ठरणार आहे. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सक्षम नसल्याने भिवंडी-निजामपूर शहर मनपाकडून सदरचा रस्ता विकसित करणेकामी निधी उपलब्ध करून देणेबाबत शासनास तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडे मागणी केली आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून मौजे. राहनाळ येथील स. नं. ५३१/१ पैकी या जमिनीवर विकास परवानगी देण्यात आलेली नाही. प्राधिकरणाकडून श्री. केयुर हरिया आणि इतर ४ या विकासकास मौजे राहनाळ येथील स. नं. १३१/१/उ पैकी या जमिनीवर मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावलीनुसार दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ रोजी विकास परवानगी देण्यात आली आहे. सदरहू स. नं. १३१/१/उ पैकी या जमिनीवर देण्यात आलेली विकास परवानगी प्रस्तावित ६० मी. रुंद रस्त्याचे आरक्षण वगळून उर्वरित निव्वळ भूखंड क्षेत्रासाठी देण्यात आली आहे.

सदर रिंगरोड साठीच्या जमीन संपादन प्रकरणी भिवंडी-निजामपूर महानगरपालिका तसेच शासन स्तरावर विविध लोकप्रतिनिधी व बाधीत शेतकरी/रहिवासी यांचेसमवेत वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या आहेत. त्यामध्ये सदर प्रकल्पाचे महत्व व आवश्यकता संबंधितांना अवगत करून संयुक्त मोजणीच्या कामास सहकार्य करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. तथापि, सर्वपक्षीय सहमती अभावी भू-संपादनाविषयी पुढील कार्यवाही व संयुक्त मोजणीचे काम स्थगित ठेवण्यात आले. तथापि, याप्रकरणी तातडीने तोडगा काढण्याच्या दृष्टीने शासनस्तरावर सर्वोतपरी प्रयत्न करण्यात येत आहे.

**************